# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी पूर्व, मुंबई-९३

दिनांक : ३०/१२/२०२१

## लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदाकरीता सूचना पत्र

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील ८६५ रिक्त पदे भरणेकरीता सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विवयां), लघुलेखक (निम्न श्रेणी), वरिष्ठ लेखापाल, सहाय्यक, लिपीक टंकलेखक, भूमापक, तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२), जोडारी (श्रेणी-२), पंपचालक (श्रेणी-२) व वीजतंत्री (श्रेणी-२) या संवर्गातील ५०२ पदे भरणेकामी दि.२०/०८/२०२१ ते दि.२७/०८/२०२१ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आल्या आहेत. सदर परीक्षेची गुणवत्ता प्रारुप यादी दि.१५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

दि.१३/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ८ (२), नुसार चाळणी परीक्षेतून 'प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या चौपट' या प्रमाणात पात्र ठरण्याऱ्या उच्चतर गुणवत्ताधारक उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेऊन यांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे प्रवर्गनिहाय निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. सदर चाळणी परीक्षा ही फक्त उमेदवारांची संख्या मर्यादित / कमी करण्यासाठी असून सदर परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांचा विचार अंतिम निवडसूची तयार करताना करण्यात येणार नाही.

उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदाकरीता व्यावसायिक परीक्षा घ्यावयाची असल्याने एका पदास चार याप्रमाणे उमेदवारांची निवड सूची तयार करण्यात आली आहे. व्यावसायिक परीक्षेचे स्थळ, तारीख व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

**प्रशासकीय अधिकारी,**
**मऔविम, मुंबई-९३**